!! समान काम - समान वेतन - समान सेवा नियम - समान कार्यपध्दती !!

CEWA
MH
State

# करारसेवा कर्मचारी कल्याणकारी संघ, महाराष्ट्र राज्य

नोंदणी क्रमांक :- PUNE/००००८४५/२०२४

Contract Service Employee Welfare Association, Maharashtra State

प्लॉट क्रं. ५८ अ, PMT कॉलनी, श्री जय तुळजा भवानी माता सह.गृह. संस्था मर्या, बिबवेवाडी, पुणे - ३२

| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्री. सुनिल शेलार<br>अध्यक्ष | श्री. दत्तात्रय चौगुले<br>उपाध्यक्ष | श्री. फराज सय्यद<br>सचिव | श्री. प्रदिप पाठक<br>सह-सचिव | श्री. सोमनाथ लामगुंडे<br>खजिनदार |
| E-mail :- ceva.maharashtra@gmail.com | | श्री. राजेश भटकर<br>सदस्य | श्री. गोरक्षनाथ भांगे<br>सदस्य | श्री. गजानन पंचलिंगे<br>निमंत्रित सदस्य |


जा.क्रं./प्रकरण-४/स्मार्ट/०१ दि. २१/०८/२०२४

प्रति,

मा. प्रकल्प संचालक,
प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष,
स्मार्ट प्रकल्प, महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय :- मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत, टी & एम कन्सल्टींग सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई मार्फत अवलंबीत अनुचित कामगार प्रथांचे अनुषंगाने.

संदर्भ :- १) संघटनेची बैठक क्रं. ५ दिनांक १४/०४/२०२४ रोजीचे इतिवृत्तामधील मुद्दा क्रं. ८.
२) टी & एम कन्सल्टींग सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई यांना देण्यात आलेले पत्र दिनांक १४/०४/२०२४.
३) टी & एम कन्सल्टींग सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई यांना देण्यात आलेले पत्र दिनांक १३/०६/२०२४.

महाराष्ट्र राज्यातील राज्य शासनाचे अधिनस्त कार्यान्वीत असलेले सर्व शासकीय विभाग / योजना / प्रकल्प / सार्वजनिक उपक्रम यामध्ये कार्यरत असलेल्या सर्व प्रकारचे करारसेवा संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी **"समान काम - समान वेतन - समान सेवा नियम - समान कार्यपध्दती"** उद्देशाने प्रस्तुत संघटनेची पायाभरणी करण्यांत आलेली आहे.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सविनय कळविण्यांत येते की, जागतिक बँक अर्थसहाय्यीत - स्मार्ट प्रकल्पांतर्गत मनुष्यबळ व्यवस्थापन संस्था म्हणून टी & एम कन्सल्टींग सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई यांनी नेमणूक करण्यांत आलेली आहे. त्यानुसार त्यांचे मार्फत स्मार्ट प्रकल्पात करार पद्धतीने नियुक्त अधिकारी / कर्मचारी यांचेबाबत गंभीर स्वरुपाच्या अनुचित कामगार पद्धतींचा अवलंब करण्यांत येत असलेबाबत संदर्भ क्रं. १ चे बैठकीमध्ये विषय चर्चेस आलेला आहे. याबाबत बहुतांश अधिकारी / कर्मचारी यांचेमध्ये तीव्र आक्रोश तथा नाराजी आहे. सदरची बाब अत्यंत संवेदनशील आणि सदरच्या कर्मचारी यांचे जनहिताशी संबंधीत आहे, यामुळे संघटनेमार्फत याबाबत पाठपुरावा करण्याचे योजिले आहे. टी & एम कन्सल्टींग सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई यांना निम्नलिखीत कामगार प्रथांचे अनुषंगाने अभिप्राय कळविण्याबाबत संघटनेच्या वतीने अवगत करण्यांत आले होते.

**कंत्राटी कर्मचारी यांचेबाबत अनुसरण्यांत येत असलेल्या अनुचित कामगार प्रथांचे वर्णन:**

१) समान काम - समान वेतन अदा करण्यांत येत नाही.
२) रजांचे बाबत धोरण अनिश्चित आहे, निश्चित अशी कोणतीही Policy नाही.
३) तक्रार निवारण, चौकशी इ. कामी आदर्श व न्यायीक कार्यपद्धती तसेच शिक्षांचे प्रावधन यांचा अभाव आहे.
४) कर्मचाऱ्यांचे नियुक्ती आदेशात अन्यायकारक, Non Approved व एकतर्फी अटी व शर्तींचा समावेश करण्यांत आलेला आहे.
५) सर्व समावेश व आदर्श HR Policy मंजुर नाही.
६) महिला कर्मचारी यांचेसाठी प्रसुती रजेची तरतूद नाही.

तथापी याबाबत अद्याप पर्यंत संबंधीत मनुष्यबळ व्यवस्थापन संस्थेने त्यांचे अभिप्राय कळविलेले नाहीत. वास्तविक पाहता सदरचे कंत्राटी कर्मचारी व्यवस्थापनाचे कार्य संबंधीत संस्थेत राज्य शासकीय योजनेच्या माध्यमातून उपलब्ध झाले आहे. यामुळे राज्य शासनाने रोजगार निर्मिती तसेच कृषि व्यवस्थापनासाठी उभारलेल्या योजनेमध्ये कर्मचारी यांचे हित जोपासणे ही बाब संबंधीत मनुष्यबळ व्यवस्थापन संस्था आणि मुख्य नियोक्ता (Principal Employer) या नात्याने प्रकल्पाची सुद्धा आहे.

सध्या देशातील वाढते बेरोजगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी केंद्र व राज्य शासना मार्फत राबविण्यांत येणाऱ्या विविध शासकीय योजनांमध्ये विविध मार्गी कांही प्रमाणावर रोजगार निर्मिती करुन देशातील बेरोजगारीवर नियंत्रण मिळवण्याचे काम केले जात आहे, किंबहूना तशी धोरणेसुद्धा आखली जात आहेत. कर्मचारी हा शासकीय असो व कंत्राटी भारतीय संविधानाने सर्वांना समान अधिकार प्रदान केले आहेत. यामुळे सदर अधिकारांचा आदर होणे अत्यंत आवश्यक आहे.

कर्मचारी कोणताही असो, कंत्राटी / शासकीय तो एक कर्मचारी नसून त्यांचेमागे त्याचे संपूर्ण कुटुंब (आई, वडील, पत्नी, मुले-मुली) निर्भर असतात. शासकीय कर्मचारी यांना न्याय मागणीसाठी बहुअंगी पर्याय उपलब्ध असतात. परंतू कंत्राटी कर्मचारी यांचेबाबत मात्र परस्थिती पुर्णत: भिन्न आहे. यामुळेच कंत्राटी कर्मचारी यांचेबाबत कोणताही निर्णय हा अपूर्ण माहिती, गैरसमज किंवा पूर्वग्रह दुषीत दृष्टीकोतून झाल्यास संबंधीत कर्मचारी यांचे संपूर्ण कुटूंब उध्वस्त होते. म्हणूनच सदर बाबीची गंभीर दखल घेवून देशाचे मा. सर्वोच्च न्यायालय आणि मा. उच्च न्यायालय यांनी कंत्राटी कर्मचारी यांचेबाबत अत्यंत संवेदनशील आणि मानवतापूर्वक दृष्टीकोणातून निर्णय घेण्याचे निर्देश राज्य शासनास विविध निर्णयाद्वारे दिलेले आहेत. परंतू या सर्वांचा विसर प्रकल्पाची मनुष्यबळ व्यवस्थापन संस्था टी & एम कन्सल्टींग सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई संस्थेस पडलेला असावा, अशी संघटनेची धारणा आहे.

राज्यातील बाहयस्त्रोत कंत्राटी धोरण बंद करावे, कंत्राटी कर्मचारी यांना सन्मानपुर्वक व न्यायीक वागणूक मिळावी अशा विविध मागण्यांचे अनुषंगाने संघटना कार्य करत आहे. याबाबत राज्य शासनास निवेदन सादर करणेत आलेले आहे. राज्यातील कंत्राटी कर्मचारी यांचे बाबत विभाग निहाय राबविण्यांत येत असलेल्या विविध योजना / प्रकल्प / उपक्रमात कार्यरत कर्मचारी यांचे म्हणने विचारात घेवून, त्यामध्ये कार्यरत कंत्राटी कर्मचारी यांसदर्भात भेदभावपूर्वक नियमावली, विसंगत प्रशासकीय नियम याबाबत भविष्यात संघटनेच्या माध्यमातून जनहित याचिका व रिट याचिकेच्या माध्यमातून मा. सर्वोच्च न्यायालय आणि मा. उच्च न्यायालय येथे दाद मागण्यांत येणार आहेतच.

प्रस्तुत पत्राद्वारे आपणास सविनय विनंती करण्यांत येते की, वरील प्रमाणे निदर्शनास आलेल्या बाबी या अत्यंत गंभीर स्वरुपाच्या असून संबंधीत संस्थे मार्फत सदरच्या कंत्राटी कर्मचारी यांचेबाबत मोठ्या प्रमाणावर भारतीय संविधानिक तरतूदींचे उल्लंघन होत असून अत्यंत अनुचित कामगार पद्धतींचा अवलंब होत आहे, असे निदर्शनास येत आहे. यामुळे सदरच्या गंभीर स्वरुपाच्या अनुचित कामगार प्रथांचे अनुषंगाने उपस्थित आक्षेपांचे अनुषंगाने उचित कार्यवाही होणे कामी, स्मार्ट प्रकल्पाचे मुख्य नियोक्ता (Principal Employer) म्हणून आपणाकडे दाद मागण्यांत येत आहे.

आपणास विनंती करण्यांत येते की, सदर विषयाची गंभीर दखल घेवून प्रकल्पातील पिडीत कंत्राटी कर्मचारी यांचे संविधानिक अधिकारांचे रक्षण होईल यापद्धतीने कंत्राटी कर्मचारी यांचेबाबत संवेदनशील व मानवतावादी दृष्टीकोण ठेवून प्रशासकीय धोरण राबविण्याबाबत कार्यवाही करण्यांत यावी, ही नम्र विनंती.

आपले उत्तराचे प्रतिक्षेत . . . . . . .

कळावे, धन्यवाद !

(सुनिल शेलार) (फराज सय्यद)

अध्यक्ष सचिव

करारसेवा कर्मचारी कल्याणकारी संघ,

महाराष्ट्र राज्य

**प्रत,**

टी & एम कन्सल्टींग सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव.